# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः31.12.2025** **वारःबुधवार**

---

•राज्यातील महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपली, आज होणार छाननी

•पीएम युवा योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातल्या ४३ विजेत्यांची घोषणा, मराठी भाषेसाठी तिघांची निवड

•सरत्या वर्षाचा निरोप घेत नवीन वर्षाच्या स्वागतासाठी सर्वत्र उत्साह, पोलिस यंत्रणा सज्ज

आणि

•महिला क्रिकेटमध्ये श्रीलंकेविरुद्धच्या 20 षटकांच्या मालिकेत भारताला निर्भेळ यश

**निवडणूकसमग्र**

राज्यातल्या 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा काल शेवटचा दिवस होता; आज या अर्जांची छाननी होईल. दोन जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. अखेरच्या दिवशी अनेक ठिकाणी जोरदार शक्तीप्रदर्शन करत उमेदवारांनी अर्ज सादर केले. मात्र उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या कालच्या अखेरच्या दिवसापर्यंत अनेक ठिकाणी युती, आघाडी, उमेदवारी यादी या बाबतचं चित्र स्पष्ट झालं नव्हतं. अनेक शहरांत उमेदवारी न मिळालेल्यानी नाराजी व्यक्त केली.

पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाची युती तुटली आहे, मात्र कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम कायम आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी महायुतीचं जागावाटपाचं सूत्र निश्चित झालं असून १३७ जागांवर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार तर ९० जागी शिवसेनेचे उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. रिपब्लिकन पक्षाला जागावाटपातून वगळल्याबद्दल पक्षाध्यक्ष रामदास आठवले यांनी नाराजी व्यक्त करत ३९ जागांवर 'मैत्रीपूर्ण लढती'साठी उमेदवार जाहीर केले.

ठाण्यात शिवसेना ८७ आणि भाजपा ४० जागांवर निवडणूक लढवत असल्याचं शिवसेना खासदार नरेश म्हस्के म्हणाले. नवी मुंबईत शिवसेना १११ जागा आणि वसई विरारमध्ये २७ जागा शिवसेना लढवत असल्याची माहिती त्यांनी दिली. भिवंडी, मीरा-भाईंदरमध्ये भाजपा आणि शिवसेना युती झालेली नाही.

नाशिकमधे भाजप स्वबळावर निवडणूक लढेल, अशी घोषणा मंत्री गिरीश महाजन यांनी काल केली. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस नाशिकमध्ये एकत्र निवडणूक लढवणार आहेत. तर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे तिन्ही पक्ष मनसेसोबत एकत्र निवडणूक लढवत आहेत.

छत्रपती संभाजीनगरमधे भाजप आणि शिवसेना स्वतंत्रपणे लढणार आहेत.

नागपूर महानगर पालिकेच्या निवडणुकीत भाजपा आणि शिवसेनेत युती झाली आहे. भाजपानं १४३ आणि शिवसेनेनं ८ उमेदवार दिले आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षही एकत्र निवडणूक लढवत आहेत.

कोल्हापूरमध्ये महायुतीमध्ये एकमत झालं आहे. तर महाविकास आघाडीमध्ये फूट पडली आहे. काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट एकत्र आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं तिसऱ्या आघाडीसोबत हातमिळवणी केली आहे.

धुळे महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसची युती झाली आहे. तर भाजपा ६३ जागा स्वबळावर लढवणार आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस ३०, शिवसेना ठाकरे गट ३० आणि राष्ट्रवादी काँग्रेस १४ जागा लढवणार आहे.

नांदेड महापालिका निवडणुकीत महायुतीसह महाविकास आघाडीचीही अद्याप घोषणा झाली नाही.

जळगाव महानगरपालिका निवडणुकीत मात्र महायुतीच्या घटक पक्षांचं मनोमिलन झालं असून तिन्ही पक्षांनी युती जाहीर केली आहे

**<u>पीएम</u>**

युवा लेखकांना मार्गदर्शन करण्यासाठी, पीएम युवा योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातल्या विजेत्यांची घोषणा काल करण्यात आली. इंग्रजीसह एकंदर २२ भारतीय भाषांमधल्या ४३ विजेत्यांचा यात समावेश आहे. मराठीसाठी दिव्यांशू सिंग, अंबादास मेव्हाणकर आणि प्रसाद जाधव या लेखकांचा विजेत्यांमध्ये समावेश आहे. सर्व विजेत्यांच्या संकल्पनांचं पुस्तकात रुपांतर करण्यासाठी या लेखकांना सहा महिन्यांचं मार्गदर्शन आणि दर महिन्याला ५० हजारांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. याशिवाय पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर आयुष्यभरासाठी १० टक्के रॉयल्टीही दिली जाणार आहे.

**<u>युवामहोत्सव</u>**

राज्यस्तरीय युवा महोत्सव पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू झाला आहे. राज्याच्या क्रीडा आणि युवक कल्याण विभागाच्या आयुक्त शितल तेली उगले यांच्या हस्ते काल या महोत्सवाचं उद्घाटन झालं. युवा महोत्सवाच्या माध्यमातून युवक-युवतींना विविध क्षेत्रांत आपले नेतृत्वगुण सिद्ध करण्याचं सशक्त व्यासपीठ मिळतं. युवकांचा सर्वांगिण विकास, भारतीय संस्कृती-परंपरांचं जतन आणि राष्ट्रीय एकात्मता अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या महोत्सवाचं आयोजन केलं जातं असं त्या म्हणाल्या. उद्यापर्यंत चालणाऱ्या या युवा महोत्सवात राज्यातील ३१२ युवक-युवती सहभागी झाले आहेत. या महोत्सवात होणाऱ्या विविध स्पर्धांतील विजेते संघ येत्या १० ते १२ जानेवारी दरम्यान दिल्लीमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवात महाराष्ट्र राज्याचं प्रतिनिधित्व करणार आहेत.

**<u>व्हीसी</u>**

इंट्रो - निर्मिती क्षेत्रासाठी आणि देशाच्या एकंदर अर्थव्यवस्थेसाठी २०२५ हे यशदायी वर्ष ठरलं. ७ पूर्णांक ८ दशांश टक्के विकास दरासह औद्योगिक क्षमतेतील वाढीमुळे भारत जगाचं नवीन उत्पादन केंद्र बनला. ऐकूया याबाबत अधिक वृत्तांत माझ्या सहकारी सुरेखा जोशी यांच्याकडून..

स्क्रिप्ट - गेल्या दहा वर्षांतल्या सुधारणांमुळे आता उच्च दर्जाच्या, गुंतागुंतीच्या वस्तूंची निर्मिती भारतात अत्यंत अचूकतेनं आणि अधिक कार्यक्षमतेनं केली जाऊ शकते हे सिद्ध झालं. ऍप्पल, सॅमसंग, गूगलसारख्या बहुराष्ट्रीय भांडवली कंपन्यांनी भारताला आपल्या उत्पादनांच्या निर्मितीचं प्रमुख केंद्र बनवलं. भारत देशातला दुसऱ्या क्रमांकाचा मोबाईल उत्पादक देश झाला. देशात विकले जाणारे जवळपास ९९ टक्के मोबाईल आता भारतात तयार होत आहेत. भारतात २०२५ मध्ये उद्योग क्षेत्रात अपेक्षेपेक्षा जवळपास दुप्पट गुणवणूक झाली. सेमी कंडक्टर आणि आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांच्या निर्मितीला वेग आला. चिप्स टू स्टार्ट अप्स या अभियानामुळे भारतातल्या सेमी कंडक्टर चिप डिझाईन करणाऱ्या युवा पिढीला जागतिक स्पर्धेत यशस्वी होण्याचा मार्ग मिळाला. इलेक्ट्रीक वाहन उत्पादन,

सौर उर्जा उत्पादन, दूरसंवाद साधनं, विमानोड्डाण साधनं अशा विविध उत्पादनांच्या निर्मितीतही भारतानं जगात आघाडी घेतली. देशाच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधेमुळं व्यवसाय सुलभता, पारदर्शिता आणि उत्पादकता वाढ शक्य झाली. अनेक परदेशी कंपन्यांनी भारतातली गुंतवणूक वाढवली. उद्योजकता वाढीमुळे देशातल्या रोजगार निर्मितीतही मोठी वाढ झाली. निर्यात प्रोत्साहन धोरणांमुळे भारताची जगाचा विश्वासार्ह पुरवठादार देश अशी ओळख तयार झाली. संरक्षण उत्पादनांची निर्यात २३ हजार ६२२ कोटींवर गेली आणि हजारो लघु उद्योग संरक्षण उत्पादन परिसंस्थेचा भाग बनले. उद्योजकता वाढ, निर्यातीत वाढ, रोजगार निर्मीती, महागाईतली घट अशा यशाच्या अनेक टप्प्यांच्या बळावर २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दीष्ट साध्य करण्याच्या दिशेनं या वर्षात भारतानं मोठा टप्पा पार केला.

**<u>नववर्ष-बंदोबस्त</u>**

2025 या वर्षातील आजचा शेवटचा दिवस....  सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचं स्वागत करण्यासाठी राज्यात सर्वत्र, विशेषतः तरुणाईमध्ये उत्साह पहायला मिळत आहे. राज्यातली पर्यटन स्थळ पर्यटकांनी फुलून गेली आहेत. शहरांमधील विविध उपाहारगृह आणि हॉटेलही सज्ज झाले आहेत. नव वर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर मुंबई ठाणे, पुणे आणि पिंपरी चिंचवडसह विविध शहरांमध्ये कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. अनेक ठिकाणी ड्रोनच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे.

दरम्यान नवीन वर्षाचं स्वागत देव दर्शनानं करण्याकडेही अनेक नागरिकांचा कल असतो, त्यासाठी शिर्डी, कोल्हापूरसारख्या राज्यातल्या महत्त्वाच्या देवस्थानांच्या ठिकाणीही आवश्यक तयारी करण्यात आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी शिर्डी इथलं साईबाबा मंदिर रात्रभर खुलं ठेवलं जाणार आहे.

**<u>विजयस्तंभ</u>**

कोरेगाव भीमा इथं उद्या 1 जानेवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभ अभिवादनासाठी मोठ्या प्रमाणावर अनुयायी येतात. या पार्श्वभूमीवर कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पुणे पोलिसांकडून तयारी करण्यात आली आहे. कोरेगाव भीमा परिसरात सुमारे साडेसात हजार पोलिस अधिकारी, कर्मचारी तैनात असतील, अशी माहिती पोलीस आयुक्त कार्यालयाकडून  देण्यात आली आहे. २२ ठिकाणी वाहनतळ निश्चित करण्यात आले आहेत. पोलिस टॉवर, ड्रोनद्वारे परिस्थितीवर देखरेख ठेवण्यात येणार असून चोरीचे प्रकार रोखण्यासाठी विशेष पोलिस पथकं नेमण्यात आली आहेत.

**<u>मानांकन</u>**

पुणे जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या जुन्नर तालुक्यातील राजुर, शिरूर तालुक्यातील  धामारी आणि बारामती तालुक्यातील जळगाव या तीन आयुष्मान आरोग्य मंदिरांना राष्ट्रीय पातळीवरील एन ए बी एच मानांकन प्राप्त झालं आहे. एन ए बी एच हे गुणवत्ता परिषदेअंतर्गत कार्यरत मंडळ असून, रुग्णालये आणि  आरोग्य संस्थांना रुग्ण सुरक्षितता आणि सेवेच्या गुणवत्तेच्या कठोर मानदंडांनुसार मान्यता देतं.  पुणे जिल्ह्यात एनएबीएच मानांकन प्राप्त करणाऱ्या या पहिल्या आयुष आरोग्य संस्था ठरल्या आहेत.

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये 20 षटकांच्या पाचव्या आणि शेवटच्या सामन्यात भारतानं श्रीलंकेचा १५ धावांनी पराभव करत या मालिकेत निर्भेळ यश मिळवलं.

तिरुअनंतपुरम इथं काल रात्री झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित २० षटकांत ७ खेळाडू गमावून १७५ धावा केल्या. १७६ धावांचं हे आव्हान पार करताना श्रीलंकेला निर्धारित 20 षटकांत १६० धावा करता आल्या.

हरमनप्रीत कौरला सामनावीर घोषित करण्यात आलं, तर शेफाली वर्मा मालिकावीर ठरली.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात थंडीचा जोर कायम आहे. काल अहिल्यानगरमध्ये  राज्यातल्या सर्वात कमी, म्हणजे 8 पूर्णांक 4 अंश सेलसीयस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.